# प्रकरण पहिले

# आर्य समाज : उदय आणि प्रसार

# प्रकरण पहिले

# आर्य समाज : उदय आणि प्रसार

आधुनिक भारताच्या इतिहासात १९ वेशतक म्हणजे नव्या युगाची सुरुवात होय. कारण या शतकात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात महत्वपूर्ण बदल घडून आले. या शतकात इंग्रजांमुळे, इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांना पाश्चात्य तत्वज्ञान, तंत्रज्ञान, इतिहास, कला, शास्त्रे यांचा परिचय झाला. पाश्चात्य शिक्षणाने जागृत झालेला वर्ग आत्मपरीक्षण करु लागला, पाश्चात्य शिक्षणाने त्यास नवी दृष्टी लाभली. त्यावेळी आपल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक जीवनातील उणिवा त्यांच्या लक्षात आल्या. जुन्या रुढी, परंपरा, अंधश्रद्धा नष्ट झाल्याशिवाय सामाजिक सुधारणा होऊ शकणार नाहीत असे सुशिक्षितांना वाटू लागले. त्यातून अनेक धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळी उदयास आल्या. त्यांनी भारतीय समाज सुधारणेच्या कामास हात घातला. सर्वप्रथम राजा राममोहन रॉय यांनी धार्मिक परिवर्तनाचे कार्य सुरु केले. त्यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजामुळे भारतामध्ये सामाजिक व धार्मिक क्षेत्रात परिवर्तनाचे एक नवे पर्व सुरु झाले. ब्राह्मो समाजापासून प्रेरणा घेवून भारताच्या निरनिराळया भागात विविध सुधारणा संघटना निर्माण झाल्या. उत्तर भारतात विशेषत: पंजाब, संयुक्त प्रांत, राजस्थान , गुजरात इत्यादी ठिकाणी स्वामी दयानंदांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाचा प्रसार मोठया प्रमाणावर झाला.

आधुनिक भारताच्या धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीच्या इतिहासात आर्य समाजाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. १९ व्या शतकातील भारतातील एक महान पंडीत, प्रभावी वक्ते व धर्मसुधारक म्हणून आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांच्याकडे पाहिले जाते. आर्य समाजाने हिंदू धर्मातील वाईट चालिरिती, रुढी,

परंपरा यावर टीका केली, वैदिक धर्माचे श्रेष्ठत्त्व पटवून देवून हिंदूमध्ये नवचैतन्य निर्माण केले. हिंदू धर्मातील विकृती व दोष दूर करुन त्यास शुद्ध स्वरुप प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न आर्य समाजाने केला व भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठतत्त्वाचा त्यांचा दावा हिंदी जनतेला नवी प्रेरणा देण्यास उपकारक ठरला.

## आर्य समाजाची स्थापना : -

आर्य समाजाचे संस्थापक महर्षी स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म इ.स. १८२४ मध्ये काठेवाड ( गुजरात ) मधील मोर्वी संस्थानातील टंकारा येथे झाला. धर्माचा खरा अर्थ आणि परमेश्वराचे सत्य स्वरुप जाणून घेण्यासाठी त्यांनी संन्यास घेतला ( १८४५ ). त्यानंतर १८ वर्षे प्रवास करण्यात व निरनिराळया गुरुंपासून ज्ञान संपादण्यात घालविली.[१] हिंदू धर्म, संस्कृती व तत्वज्ञानाचा अभ्यास करुन ज्ञानप्राप्त केले. मिळालेल्या ज्ञानाच्या प्रसारासाठी दयानंदानी भारतभर प्रवास केला. प्रथम ते संस्कृत भाषेतून व्याख्यान देत. इ.स. १८७२ मध्ये त्यांची ब्राह्मो समाजाचे नेते केशवचंद्र सेन यांच्याशी भेट झाली. त्यांनी दयानंदाना लोकांना समजेल अशा भाषेतून व्याख्याने देण्याची विनंती केली. त्यानंतर त्यांनी हिंदीतून आपले विचार मांडण्यास सुरुवात केली. इ .स. १८७५ मध्ये त्यांनी हिंदीतून लिहिलेला 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ बनारस येथे प्रकाशित करण्यात आला.[२]

वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आणि वैदिक तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल, १८७५ मध्ये काकडवाडी, मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली.[३] जातिव्यवस्था, मूर्तिपूजा, कर्मकांडे, अंधश्रद्धा यावर त्यांनी टीका केली. सत्यार्थ प्रकाश, संस्कारविधी, ऋग्वेदभाष्य, यजुर्वेदभाष्य असे ग्रंथ लिहून आर्य समाजाचा प्रचार केला वैदिक धर्माचे महत्त्व व तत्वज्ञान स्पष्ट केले.[४]

'वेदाकडे परत चला' ही त्यांची शिकवण होती. [५] इ.स. १८७७ मध्ये पंजाबमधील लाहोर येथे त्यांनी आर्य समाजाची शाखा स्थापन केली. पुढे लाहोर हेच आर्य समाजाचे मुख्य केंद्र बनले. कालांतराने पंजाब, संयुक्त प्रांत, राजस्थान, गुजरात इत्यादी प्रांतात आर्य समाजाच्या अनेक शाखा स्थापन होवून समाजास तेथे मोठया प्रमाणावर लोकप्रियता मिळाली. [६] पंजाबात लाला हंसराज, लाला लजपतराय, लाला हरदयाळ, स्वामी श्रद्धानंद उर्फ लाला मुन्शीराम यासारखे अनुयायी मिळाल्याने आर्य समाजाची लोकप्रियता तेथे झपाटयाने वाढली. आर्य समाजाने धार्मिक व सामाजिक सुधारणांबरोबर शैक्षणिक क्षेत्रातही महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्यामुळे भारताच्या अर्वाचीन पुनरुत्थानाच्या कार्यात आर्य समाजाचा वाटा फार मोठा आहे.

## आर्य समाजाची तत्वे :-

आर्य समाजाने वेदप्रामाण्यावर भर दिला. आर्य समाजाची मुख्य दहा तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१. सर्व यथार्थ ज्ञानाचा उगम व सर्व वस्तूंचे आदिकारण परमेश्वर आहे.

२. ईश्वर हा सच्चिदानंदस्वरुप असून तो अनादी, अनंत, निराकार, निष्कलंक, सर्वशक्तिमान, सर्वसाक्षी, परमन्यायी, कनवाळू, सर्व जगाचा निर्माता, शास्ता व पालक आहे. त्याचीच उपासना करावी.

३. वेद हे त्या ईश्वराचीच नि:श्वसिते होत. सर्व यथार्थ ज्ञानाचा उगम वेदातच असल्यामुळे वेदांचे अध्ययन करणे व करविणे, हे प्रत्येक आर्याचे पवित्र कर्तव्य आहे.

४. प्रत्येक आर्याने सत्याचे ग्रहण करण्यास व असत्याचा त्याग करण्यास तयार असले पाहिजे.

५. व्यवहारातील प्रत्येक कृत्य धर्माला अनुसरुन केले पाहिजे. प्रत्येक कृत्य करण्यापूर्वी ते नीतिनियमाला धरुन असल्याबद्दल खात्री करुन घेतली पाहिजे.

६. मानवाची आधिभौतिक, सामाजिक, आध्यात्मिक वर्ग वगैरे प्रत्येक बाबतीत उन्नती करुन मनुष्यजातीचे सर्वांगिण कल्याण साधणे, हाच आर्य समाजाचा मुख्य उद्देश आहे.

७. सर्वांशी प्रेमाने व न्यायाने वागणे, हे प्रत्येक आर्याचे कर्तव्य आहे.

८. अज्ञानाचा नाश करुन ज्ञानाचा प्रसार करणे, हे ध्येय असावे.

९. केवळ स्वत:च्या कल्याणातच समाधान न मानता प्रत्येकाने दुस-याच्या उत्कर्षातच आपला उत्कर्ष आहे, असे मानले पाहिजे.

१०. सामाजिक कल्याणासाठी प्रत्येकाने वैयक्तिक मतभेद व हेवेदावे विसरुन झटले पाहिजे. परंतु खाजगी व वैयक्तिक हिताच्या बाबतीत प्रत्येकाला आपल्या मताप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य असावे.

आर्य समाजाच्या वरील दहा तत्त्वांपैकी पहिली तीन तत्त्वे धार्मिकदृष्टया अत्यंत महत्वाची आहेत. बाकीची तत्त्वे हे केवळ नीतिनियम आहेत. वरील तत्त्वांवरच आर्य समाजाची उभारणी झाली होती.

स्वामी दयानंदानी केवळ चार वेदच प्रमाण मानले. सहा शास्त्रे व अठरा पुराणे त्यांनी प्रमाण मानली नाहीत. वेदात मूर्तीपूजा, अवतारवाद, तीर्थे, पौराणिक अनुष्ठाने इत्यादी गोष्टींचा पुरस्कार नाही. म्हणून दयानंदानी या सर्व गोष्टी मिथ्या मानल्या. केवळ वेद प्रमाण मानण्याची कारणे त्यांनी पुढीलप्रमाणे सांगितली : -

१. वेद हे ईश्वरप्रणीत आहेत. कारण त्यातील ज्ञानाचा सृष्टी प्रक्रियेशी पूर्ण मेळ आहे.

२. दुस-या कोणत्याही ग्रंथातील ज्ञानाचा सृष्टीतील गोष्टीशी इतका मेळ बसत नाही.

३. वेदग्रंथ हे मानवजातीच्या वैज्ञानिक व पारमार्थिक विचारांचे उगम आहेत.

अशा प्रकारची तत्त्वप्रणाली स्वीकारुन आर्य समाजाने भारताला पुनश्च वैदिक मार्गावर नेणे व सर्व जगाला वैदिक धर्म शिकविणे, ही दोन आपली परमश्रेष्ठ कर्तव्य मानली आणि वेदांच्या उद्धाराचे व प्रचाराचे कार्य हिरिरीने चालू केले. [७]

वेद हे स्वयंसिद्ध व ईश्वरी ( अपौरुषेय ) आहेत असे आर्य समाज मानतो. [८] आर्य समाज त्रैतवादी आहे. म्हणजे प्रकृति, जीव व परमेश्वर हे अनादी व अनंत आहेत असे मानतो. परमेश्वराची भक्ति करण्यात त्यास कोणा मध्यस्थाची गरज वाटत नाही. दैववाद व अवतारवाद यावर त्यांचा विश्वास नाही. [९] आर्य समाज जन्मसिद्ध जातीभेद मानीत नाही. परंतु गुणकर्मांनी बनलेले चातुर्वर्ण्य मानतो. वेदाध्ययचाचा अधिकार तो सर्वांना मानतो. त्यांच्या मतानुसार प्रत्येक व्यक्तीचे मोक्ष मिळविणे हे ध्येय असले पाहिजे व ते प्रत्येक व्यक्तीने स्वप्रयत्नाने साध्य केले पाहिजे. त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. विशिष्ट परिस्थितीत ते विधवा विवाहास परवानगी देतात. काही आपत्तीपुरती नियोग पद्धतीही त्यांना मान्य आहे. हिंदूंचे सोळा संस्कार आर्य समाजाला मान्य आहेत; पण त्यांचे वेदकालीन साधे स्वरुप तेवढेच त्यांनी स्विकारले आहे. याशिवाय प्रत्येक आर्य समाजी पुरुषाने पंचमहायज्ञ रोज केले पाहिजेत. ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, अतिथियज्ञ, बलियज्ञ हे पंचमहायज्ञ होत. [१०]

इ.स.१८८३ मध्ये स्वामी दयानंद मृत्यू पावल्यानंतर आर्य समाजाच्या अनुयायांत फूट पडून त्यांच्या दोन शाखा झाल्या. मांसाहार व उच्च शिक्षण हे या दोन शाखातील मतभेदाचे मुद्दे होते. यापैकी ज्या लोकांनी मांसाहाराचा पुरस्कार केला, त्यांना मांसाहारी व इतरांना शाकाहारी अशी नावे मिळाली. त्याचप्रमाणे ज्यांनी महाविद्यालयीन शिक्षणाला मान्यता दिली, त्यांना महाविद्यालय पक्ष व इतरांना महात्मा पक्ष किंवा पुराणमतवादी पक्ष अशी नावे पडली.

आर्य समाजाच्या स्थानिक, प्रांतीक अखिल भारतीय अशा स्वरुपाच्या एकूण तीन सभा आहेत. आर्य समाजाच्या दहा तत्त्वांवर श्रद्धा असणारे, दयानंदानी वेदांचा अर्थ लावण्याकरिता ठरविलेल्या नियमांवर विश्वास ठेवणारे, आपल्या उत्पन्नाचा शतांश सभासद शुल्क म्हणून देणारे व सभेला नियमित हजर राहणारे लोक, हे समाजाचे सभासद होऊ शकतात.[११]

आर्य समाजाची धार्मिक उपासना आठवडयातून एकदा दर रविवारी सकाळी होते.उपासनेच्या प्रारंभी व्यासपीठाजवळील अग्नीत समंत्रक आहुती देऊन मग उपासनेस प्रारंभ होतो. ही उपासना तीन - चार तास चालते. समाजाची दीक्षा व मागासलेल्या जातींना शिक्षण देऊन त्यांचा उद्धार करणे, ही आर्य समाजाची सर्वात मोठी कार्ये मानली जातात.

प्रार्थना समाज व ब्राह्मो समाज ह्यांच्यापेक्षा जनमतावर आर्य समाजाचा पगडा विशेष आहे. सुरुवातीस आर्य समाजास सनातन हिंदू धर्मीयांचा विरोध झाला. पण त्या विरोधास न जुमानता समाजाच्या कार्यकर्त्यांनी वेदप्रणीत धर्माच्या पुनरुत्थानाचे महान कार्य केले.[१२] ख्रिस्ती व इस्लाम धर्माच्या आक्रमणापासून हिंदू धर्माचे रक्षण करण्याचे काम आर्य समाजाने केले आहे. ख-या अर्थाने उत्तर भारतातील हिंदूना जागे करुन त्यांना प्रगतिशील करण्याचे सारे श्रेय आर्य समाजालाच आहे.[१३]

आर्य समाजाने केलेल्या कार्यात शुद्धीकरण चळवळ ही एक महत्त्वाची कामगिरी मानली जाते. हिंदू धर्मातून परधर्मात गेलेल्यांना परत स्वधर्मात शुद्ध करुन घेण्याचे कार्य आर्य समाजाने केले. आर्य समाजाने स्त्री शिक्षणास उत्तेजन दिले व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. ‘ आर्यावर्त हा आर्यांचा आहे ’ असे स्वामी दयानंद सरस्वतींनी जाहीर करुन लोकांत राष्ट्रभक्तीची भावना निर्माण केली. आर्य समाजाने शिक्षणप्रसाराच्या कार्यातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. लाला हंसराज

यांनी इ.स.१८८९ मध्ये लाहोर येथे 'दयानंद अँग्लो वेदिक कॉलेज ' ची स्थापना केली. येथे इंग्रजी शिक्षणाबरोबरच वैदिक धर्माचे शिक्षण दिले जात होते. स्वामी दयानंदांचे शिकवणीप्रमाणे शिक्षण घ्यावे असे म्हणणा-यांचा एक गट इ.स. १८९२ मध्ये आर्य समाजात निर्माण झाला. या गटातील लाला मुन्शीराम यांनी १९०२ मध्ये हरद्वारजवळ कांगरी येथे वैदिक आदर्शानुसार शिक्षण देणारी ' गुरुकुल ' नावाची शिक्षणसंस्था स्थापन केली. याशिवाय आर्य समाजाने ठिकठिकाणी शाळा व महाविद्यालये काढली. राजकीय कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी लाला लजपतरायनी ' टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स ' नावाची संस्था काढली.

स्वातंत्र्यपूर्व काळात आर्य समाजाच्या सुमारे १७०० शाखा होत्या. त्याचप्रमाणे ३० पेक्षा जास्त महाविद्यालये, असंख्य माध्यमिक शाळा, २० अनाथालये, ४० विधवा आश्रम, गुरुकुल, अनेक कन्याशाळा, कन्या महाविद्यालये एवढा मोठा आर्य समाजाच्या कार्याचा विस्तार होता. दुष्काळग्रस्त, पूरग्रस्त लोकांना मदत करुन त्यांची दु:खे दूर करण्याचा प्रयत्न आर्य समाजाने केला. धार्मिक, मानवताविषयक, राजकीय क्षेत्रात आर्य समाजाचा स्वार्थत्याग वाखाणण्याजोगा आहे.[१४] आर्य समाजाचे कार्यक्षेत्र मुख्यत: पंजाब व संयुक्त प्रांत हेच ठरले. १९११ ला या संप्रदायात २४३००० लोक होते. यापैकी जवळ - जवळ निम्मे मीरत, आग्रा, रोहिलखंड या विभागात असून जवळ - जवळ दोन पंचमांश पंजाबात होते, दयानंद सरस्वती वारले त्यावेळी पंजाब व संयुक्त प्रांतात आर्य समाजाच्या ३०० च्या वर शाखा होत्या.[१५] आर्य समाजाची शिकवण व तत्वे दक्षिणेतील प्रांतात फारशी रुजली नाहीत. मद्रास इलाख्यात तर आर्य समाजाचा प्रवेशसुद्धा झाला नाही. परिणामत: आर्य समाजाचा प्रसार प्रामुख्याने उत्तरेत जास्त झाला.[१६] शिवाय ब्रह्मदेश, सयाम, कंबोडिया, अन्नाम, हाँगकाँग , पूर्व आफ्रिका, द. आफ्रिका,

मॉरिशस, फिजी, ब्रिटिश व डच गियाना इत्यादी ठिकाणी आर्य समाजाच्या शाखा असून कार्य चालू आहे. [१७]

## आर्य समाज आणि महाराष्ट्र :-

आर्य समाजाची स्थापना जरी मुंबईत झाली ( १८७५ ), तरी त्याचा फारसा प्रसार मुंबई इलाख्यात झाला नाही. [१८] आर्य समाज हा हिंदू धर्माचे अधिकृत धर्मग्रंथ म्हणून वेदांना मानणारा आणि वैदिक तत्त्वज्ञान व संस्कृती यांचा जोरकस पुरस्कार करणारा होता. असे असूनही महाराष्ट्रातील वेदाभिमानी ब्राहमण वर्गाचा त्यास कडवा विरोध होता, याचे मुख्य कारण म्हणजे वेदावरील ब्राह्मणांची धार्मिक मक्तेदारी आर्य समाजास मान्य नव्हती. आर्य समाज वेदांचा अधिकार स्त्रीवर्गासह समस्त शूद्रातिशूद्रांना खुला आहे, असे प्रतिपादन करीत होता. एवढेच नव्हे तर हिंदू धर्मातील जन्माधिष्ठित जातिभेदाचा व अस्पृश्यतेचा तीव्र निषेध करुन स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह यासारख्या सुधारणांचा हा समाज पुरस्कार करीत होता. [१९] आर्य समाजाच्या या पुरोगामी मतांचा प्रभाव महाराष्ट्रातील लोकहितवादी, न्या. रानडे यांच्यासारखे सुधारकांवरही निर्माण झाला होता. न्या. रानडेंच्या निमंत्रणावरुन स्वामीजी पुण्यात आले (२० जून, १८७५ ). पुण्यात त्यांची जवळपास पन्नास व्याख्याने झाली. ही व्याख्याने फारच प्रभावशाली ठरली. त्यांच्या सन्मानार्थ पुण्यातील सुधारकांनी स्वामीजींची हत्तीवरुन मिरवणूक काढली. लोकहितवादी, रानडे, जोतीराव फुले यांच्यासारख्या समाजसुधारकानींही मिरवणूकीत भाग घेतला होता. [२०] या मिरवणुकीस उत्तर म्हणून पुण्यातील सनातन्यांनी एका गाढवाची मिरवणूक काढून ' स्वामी गर्दभानंद की जय ' अशा घोषणा देऊन स्वामीजींची टिंगल केली. पुण्यातील सनातन्यांचे नेतृत्त्व करणा-या विष्णुशास्त्रींनी दयानंदांचा ' महार, मांग प्रभृति शूद्र जातींचा अभ्युदय करणारे

तेज उदय पावले 'असा कुत्सित उल्लेख करुन आपल्या 'निबंधमाले' तून निंदाव्यंजक अस्त्र सोडले होते. [२१]

लोकहितवादींवर स्वामीजींचा पूर्ण प्रभाव होता. ते मुंबई आर्य समाजाचे विश्वस्त व अध्यक्ष झाले. महर्षींनी आपल्या मृत्यूपत्राद्‌वारे निर्माण केलेल्या परोपकारिणी सभेचे लोकहितवादी व न्या. रानडे हे विश्वस्त होते. प्रार्थना समाज आर्य समाजात विलीन करण्याचा प्रयत्न या काळात झाला होता. स्वामीजींच्या काळात व नंतर जवळ - जवळ सर्व मराठवाड्यात आर्य समाजाच्या शाखा निर्माण झाल्या. निजामाविरुद्‌ध झालेल्या निशस्त्र आर्यसत्याग्रहाद्‌वारे आर्य समाजाची ओळख घराघरात पोहचली. [२२]

दक्षिणेच्या प्रदेशात आर्य समाजाची स्थापना सर्व प्रथम मराठवाडा विभागात झाली. इ.स. १८९१ मध्ये बीड जिल्ह्यातील 'धारुर' या ठिकाणी श्री. पंडित भागवत स्वरुप आणि श्री. गोकूळप्रसाद तिवारी यांच्या प्रयत्याने आर्य समाजाची स्थापना झाली. आर्य समाज धारुर या पहिल्या शाखेनंतर हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाच्या कार्यास प्रारंभ झाला. इ.स. १८९२ मध्ये हैद्राबाद शहरात आर्य समाजाची स्थापना झाली. श्री. कामताप्रसाद हे समाजाचे अध्यक्ष व महात्मा लक्ष्मण दासजी हे सेक्रेटरी होते. पुढे हैद्राबाद हेच आर्य समाजाचे दक्षिणेतील प्रमुख केंद्र झाले. आर्य समाजाच्या तत्वज्ञानाने व विचाराने प्रभावित होऊन अनेक बुद्‌धीजीवी आर्य समाजाच्या चळवळीत सहभागी झाले. निजामी सत्तेला शह देऊन हिंदू धर्माचे रक्षण करणारा आशेचा किरण त्यांत त्यांना दिसू लागला. त्यामुळे ही चळवळ मराठवाडयात जोमाने पसरली.

मुंबईनंतर धारुर या ठिकाणी आर्य समाजाची शाखा स्थापन झाली. त्यामुळे धारुरचा आर्य समाज शाखेत दुसरा क्रमांक लागतो. धारुरनंतर हैद्राबाद हेच ख-या अर्थीने तत्कालीन स्थितीतील आर्य समाजाचे प्रभावी केंद्र होते.तद्‌नंतर इतरत्र त्याचा प्रसार झाला. स्वामी आत्मानंद, पं. खुझीराम, श्री. किशनदास, श्री. सेवकलाल हे

प्रतिनिधी संस्थानाबाहेरुन हैद्राबाद राज्यात आले होते, श्री गोकूळ प्रसाद, पं. दीनदयाळ शर्मा, पं. बाळकृष्ण शर्मा, नित्यानंद ब्रह्मचारी इत्यादींनी हैद्राबाद राज्यात आर्य समाजाच्या प्रचाराचे कार्य केले.त्यामुळे हळूहळू हैद्राबाद संस्थानात तसेच मराठवाड्यात आर्य समाजाच्या अनेक शाखा स्थापन करण्यात आल्या. मराठवाड्यात धारुरनंतर उदगीर ( १९२६ ), निलंगा ( १९३० ), लातूर ( १९३२ ), जालना (१९३२ ), रेणापूर - लातूर जिल्हा (१९३२ ), गुंजोटी - उस्मानाबाद (१९३३), नांदेड ( १९३८ ), पाटपिंपरी (१९४०) इत्यादी ठिकाणी आर्य समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. प्रामुख्याने उस्मानाबाद,कळंब, तुळजापूर, आपसिंगा इत्यादी ठिकाणच्या अनेक शाखांची उभारणी भावी काळात आर्य समाजाच्या प्रसारास उपयुक्त ठरली. आर्यसमाजाच्या प्रसाराचे मराठवाड्यातील सर्वाधिक प्रमाण उस्मानाबाद व लातूर जिल्हयात अधिक असल्याचे आढळून येते. त्याचबरोबर नांदेड, परभणी, बीड, औरंगाबाद येथेही आर्य समाजाचा प्रभाव कमी - अधिक प्रमाणात असल्याचे आढळून येते.

याशिवाय परळी वैजनाथ, आंबेजोगाई, चिंचवड जि. बीड इत्यादी ठिकाणी आर्यसमाजाची स्थापना होवून त्याचा प्रसार करण्यात येत होता. वरील सर्व आर्य समाजी शाखांमधून वैदिक धर्माच्या प्रसाराच्या धार्मिक कार्याबरोबरच निजामी सत्तेच्या अन्यायी राजवटीस विरोध करण्याचे कार्यही चालू होते. सामाजिक, धार्मिक कार्याबरोबरच राजकीय व शैक्षणिक कार्यालाही समाजात महत्त्वपूर्ण स्थान दिले जात होते. [२३]

## शाहू महाराज आणि आर्य समाज: -

विसाव्या शतकाच्या पहिल्या दुस-या दशकात सत्यशोधक समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज,थिऑसॉफिकल सोसायटी, आर्य समाज यांच्या विचारांचा प्रभाव कमी -अधिक प्रमाणात होता. या समाजाच्या चळवळींशी कोल्हापूर संस्थानाचे पुरोगामी

विचारांचे अधिपती राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे निकटचे संबंध होते. तथापि महाराज आर्य समाजाकडे विशेषत्त्वाने आकर्षिले गेले.

शाहू महाराजांच्या काळात महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाला सामाजिक क्षेत्रात महत्त्वाचे स्थान होते. प्रार्थना समाज व ब्राम्हो समाज यांचे विचारही समाजाच्या वरच्या वर्गात प्रचलित होते. उत्तर हिंदुस्थानात आर्य समाजाचा प्रसार मोठया प्रमाणात झाला होता.[२४] आर्य समाजाने अनेक शैक्षणिक संस्था स्थापून राष्ट्रोद्धाराची मोठी चळवळ निर्माण केली. त्याने अनेक धार्मिक सुधारणांचा पुरस्कार करुन हिंदूंचा सांस्कृतिक आत्मा जागा केला आणि राष्ट्रीय पुनरुत्थानाला हातभार लावला. शाहू महाराजांनी जेंव्हा सामाजिक सुधारणांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. तेंव्हा आर्य समाज ही देशातील राष्ट्रीय स्वरुपाची एक प्रमुख सामाजिक, धार्मिक चळवळ बनलेली होती. १९०२ साली जेंव्हा महाराजांना दुसरे एक संस्थानिक सर प्रतापसिंहांनी आर्य समाजाच्या तत्त्वज्ञानाचा प्रथम परिचय करुन दिला. तेंव्हा कोल्हापूरात वेदोक्त प्रकरणाचा भडका उडालेला होता. कोल्हापूरातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील ब्राम्हण वर्गाने महाराजांना ' शुद्र ' ठरवून त्यांना वेदोक्ताचा अधिकार नाकारलेला होता. या पार्श्वभूमीवर हिंदू धर्मातील सर्वांना, अगदी स्त्री - शूद्रातीशूद्रांनासुद्धा, वेदांचा अधिकार देणा-या आर्यसमाजा विषयी महाराजांना ममत्त्व वाटणे स्वाभाविक होते. तथापि त्यांनी आर्य समाजाचा स्वीकार घाईघाईने केलेला दिसत नाही.[२५]

शाहू महाराजांचा आर्य समाजाशी फार पूर्वीच म्हणजे विद्यार्थी दशेतच संबंध आला होता. राज्यारोहणपूर्व काळात ते १८८२ साली उत्तर हिंदुस्थानाच्या शैक्षणिक सफरीत असता मथुरा या ठिकाणच्या आर्य समाजाने त्यांचा मानपत्र देऊन गौरव केला होता. पण आर्य समाजाच्या तत्त्वज्ञानाचा व कार्यपद्धतीचा त्यांना खरा परिचय १९०२ साली झाला. त्या साली बादशाह सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणाच्या समारंभास

उपस्थित राहण्यासाठी ते इंग्लंडला जात असता इदार[२६] चे नरेश सर प्रतापसिंह महाराज यांच्याशी त्यांची भेट झाली. सर प्रतापसिंह हे मूळच्या जोधपूरच्या राठोड धराण्यातून इदारच्या गादीवर आले होते व त्यांनी आर्य समाजाचा स्वीकार केलेला होता. महाराज व सर प्रतापसिंह एकाच बोटीने प्रवास करीत असता उभयतांच्या भेटीत अनेक प्रश्नांवर चर्चा होत असत. त्यामध्ये ' आर्य समाज ' हा एक प्रमुख विषय असे. पुढे महराजांनी या चर्चेची आठवण एका जाहीर भाषणात सांगताना म्हटले आहे की, प्रतापसिंहानीच आपणास आर्य समाजाची मते समजावून दिली. त्यानंतर बडोद्यातील आर्य समाजाचे प्रचारक पंडित आत्माराम यांच्याशीही त्यांच्या भेटीगाठी झाल्या. त्यातून ते आर्य समाजाकडे अधिकाअधिक आकृष्ट होऊन त्याची परिणती त्यांनी आर्य समाजाचा स्वीकार करण्यात झाली.[२७]

त्याकाळी महाराजांच्या मनाला उत्कटतेने जाणवलेले विचार आणि आर्य समाजाच्या प्रणेत्यांनी मांडलेले विचार यात फार मोठे साधर्म्य दिसून येते. आर्य समाजाने वेदप्रणित आर्य धर्माचा पुरस्कार केला आणि त्या विचारांच्या आधारे हिंदू समाजाची पुनर्रचना करावी, असा धर्म सुधारणावादी प्रचार देशभर केला. वैदिक वाङ्मयात चातुर्वर्ण्य नाही, अस्पृश्यता नाही हे आर्य समाजाचे विचार महाराजांना प्रभावित करणारे होते आणि म्हणूनच आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद यांच्या कार्याविषयी त्यांनी आदर तर दाखविलाच, पण त्यांच्या कार्याचा आदर्शही समोर ठेवला. आर्य समाजाने स्पर्शास्पर्शतेचे काल्पनिक बंड मोडले. आर्य धर्म मानव समाजाकरिता आहे, हा विचार प्रसृत केला. अशा अनेक वैशिष्ट्यांसाठी आर्य समाजाचे आपल्याला आकर्षण वाटते, असे महाराजांनी सभा परिषदांतून बोलून दाखविले. एवढेच नव्हे तर महर्षी दयानंद व त्यांचे गुरु स्वामी बिरजानंद यांनी जी ज्ञानज्योत आर्य भूमीत पाजळली तिच्या मागे ईश्वरी संकेत आहे, असे महाराजांनी बोलून दाखविले. आर्य समाजाच्या परिषदांना ते

आवर्जून उपस्थित राहिले. आर्य समाजाची तत्त्वे भारताच्या सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनाची पुनर्रचना करण्यासाठी आवश्यक आहेत, असे त्या परिषदांतून त्यांनी प्रतिपादन केले. आर्यसमाजाने आपल्याला नवा विचार दिला, नवी दृष्टी दिली आणि सामाजिक व धार्मिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी नवा मार्ग दाखविला,असे महाराजांनी अनेकदा म्हटले. [२८]

शाहू महाराज १८ जानेवारी ; १९१८ रोजी रॉबर्टसन यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, ' दुस-या एका उद्देशाने मी सत्यशोधक समाज व आर्य समाज ह्यांना पाठिंबा देत आहे. मी स्वत: हृदयाने आर्य समाजवादी आहे, आणि मी जरी तसे उघडपणे बोललो नाही तरी मी त्यांच्या तत्त्वांचा चाहता आहे. मला ब्राह्मणांनी वाईट रीतीने वागविले आहे आणि विशेषत: खामगाव परिषदेतील माझ्या भाषणानंतर ( २७ डिंसेबर, १९१७ ) त्यांनी माझ्याशी जे वर्तन केले त्यामुळे आर्य समाजाच्या तत्त्वांविषयी उघडपणे प्रेम दाखविण्यास मला ते एक ताजे कारण घडले आहे. आर्यसमाज आपणास वेदनिष्ठा शिकवितो, पुराणनिष्ठा नव्हे. कारण पुराणे ही वेदनिर्मिती नंतरच्या कालखंडातील ब्राह्मणांनी निर्माण केलेल्या कल्पित कथा आहेत. इदारचे महाराज सर प्रतापसिंगजी आणि मी अनेकवेळा ह्या तत्त्वासंबंधी विचारविनिमय केला आहे व त्याबाबतीत आम्ही दोघेही एकाच मताचे आहोत.' याच पत्रात महाराजांनी पुढे म्हटले आहे की, ' आर्य समाजाची तत्त्वे मनुष्याची समानता शिकवितात, आणि ब्राह्मणांची धार्मिक मक्तेदारी झुगारुन देण्यास सांगतात. [२९]

मानवी समता हे आर्य समाजाचे उद्घोषित तत्त्व होते. आर्य समाजास अभिप्रेत असलेल्या वैदिक संस्कृतीत व समाजरचनेत जातिभेद व अस्पृश्यता यांना थारा नव्हता, स्वाभाविकच शाहू महाराजांसारख्या सुधारक राजास ते जातिभेद नष्ट करण्याचे एक प्रभावी साधन आहे असे वाटत होते. [३०] याशिवाय माणसाची उपजत धार्मिक भूक आर्य

समाजास योग्य वाटत होती. महाराजांच्या जीवनात धर्मश्रद्धेला जे स्थान होते, त्या बाबतीत आर्य समाजाचा त्यांना उपयोग होण्यासारखा वाटत होता. समाजसुधारणा, शिक्षणप्रसार, समाजजागृती हे त्यांचे ईप्सित होते. यासाठी आर्य समाजाच्या विचारांचा उपयोग होवू शकेल, याविषयी त्यांना खात्री होती. शाहू महाराजांना हिंदू धर्मातील विषमता, अस्पृश्यता, कर्मकांड नष्ट करण्यासाठी आर्य समाजाच्या वेदप्रणित धार्मिक विचारांची गरज वाटत होती. त्यांना ब्राह्मण वर्चस्वाचा नव्हे तर शुद्ध वैदिक स्वरुपाचा धर्म हवा होता. त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. [३१]

शाहूंच्या जीवनात १९१८ साल हे मोठे मानसिक क्रांतीचे ठरले. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे सत्यशोधक समाज क्रांतीकारक होवू शकला नाही. म्हणून ते असंतुष्ट झाले; अंतर्मुख झाले होते. खामगावच्या परिषदेमध्ये तर त्यांनी जाहीरपणे सत्यशोधकांच्या कार्याविषयी असमाधान व्यक्त केले होते. सत्यशोधक समाजाला ब्राह्मणशाहीचे वर्चस्व समूळ नष्ट करण्यात यश न आल्याने छत्रपतींनी सत्यशोधक समाजाला सहाय्य व्हावे या हेतूने आर्य समाजाची स्थापना केली. [३२] त्यांच्या मते ब्राह्मणशाहीची 'काळी बाजू उघडी करुन दाखविणे ' या कामी सत्यशोधक समाज यशस्वी झाला असला तरी तिची जुलमी सत्ता तो उलथून पाडू शकला नाही. ब्राह्मणशाहीशी चालू असलेल्या लढाईत आर्य समाजासारख्या आणखी एका सहकारी संघटनेच्या साहाय्याची आवश्यकता आहे, विशेषत: आर्य समाजातील जे ब्राह्मणी मक्तेदारीविरुद्ध कडवा पवित्रा घेणारे ' जहालवादी ' आहेत ते या कामी अधिक साहाय्यभूत होतील, असे त्यांना वाटत होते, राजनैतिक प्रतिनिधी वुडहाऊस यांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात, ' मुसलमान, आर्यसमाजवादी आणि ब्राह्मण या सर्वात जहालवादी कार्यकर्ते आहेत, पण माझे मत असे आहे की, ब्राह्मणांच्या सर्व धार्मिक लबाडया उघड करुन

दाखविण्यासाठी व त्यांना शह देण्यासाठी जहालमतवादी प्रतिस्पर्धी असावेत. यासाठीच मी आर्य समाजाला उत्तेजन देतो.'[३३]

आर्य समाज ही एक धार्मिक, सामाजिक संस्था गणली जात असे. आर्य समाज सर्व हिंदूंचा वेदोक्ताचा अधिकार मान्य करी आणि तो अधिकार महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी शाहूंना देण्याचे नाकारले होते. आर्य समाजाला पाठिंबा देण्यास शाहूंना दुसरे एक महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे सत्यशोधक समाजाप्रमाणे आर्यसमाजही अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेला होता, हे होय.[३४]

## आर्य समाजाची कोल्हापूरात स्थापना :-

नंतरच्या काळात राजर्षी शाहू महाराजांनी इ.स. १९१८ मध्ये कोल्हापूर संस्थानात आर्य समाजाची स्थापना केली. व आपल्या शिक्षणसंस्था त्यांनी आर्य समाजाकडे सुपूर्द केल्या.[३५] जानेवारी १९१८ मध्ये कोल्हापूरात आर्यसमाजाची स्थापना शाहू महाराजांच्या आश्रयाखाली झाली. या कामी बडोद्याचे पंडित आत्माराम यांचे त्यांना सहाय्य लाभले. आग-याहून आलेल्या स्वामी परमानंद यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूरातील आर्य समाजाचे कार्य तत्पूर्वीच सुरु झाले होते, १९१७ सालीच स्वामी परमानंदानी कोल्हापूर जवळच्या केरले या गावी प्राथमिक शाळा आणि गुरुकुल यांची स्थापना केली होती. त्या गुरुकुलातील ३० विद्यार्थ्यांच्या भोजनाच्या खर्चासाठी महाराजांनी रू. ५००० मंजूर केल्याचा एक आदेश उपलब्ध आहे. पुढे लवकरच महाराजांच्या आज्ञेने आर्य समाजाचे एक 'फर्स्ट ग्रेड ॲंग्लो व्हर्नाक्युलर स्कूल' व त्याला जोडूनच एक गुरुकूल स्थापन करण्यात आले. त्यासाठी जागा व इमारतीही दिल्या. गुरुकुलातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सर्व व्यवस्था मोफत करण्यात आली. केरलीची शाळा व गुरुकुलही या संस्थेस जोडण्यात आले. हे सर्व शैक्षणिक कार्य संयुक्त प्रांतातील

'आर्य प्रतिनिधी सभे' कडे सोपविले गेले होते. [३६] तसेच शाहू महाराजांनी राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेज, ट्रेनिंग कॉलेज, पाटील - तलाठी क्लास या संस्थाही चालविण्यासाठी आर्य समाजाकडे दिल्या. [३७]

एकोणिसावे शतक हे भारताच्या इतिहासातील सामाजिक, धार्मिक सुधारणांचे शतक मानले जाते. त्या काळात सामाजिक व धार्मिक सुधारणा आणि शिक्षण प्रसार या क्षेत्रात दयानंद सरस्वतींनी स्थापन केलेल्या आर्य समाजाने मौलिक कामगिरी बजावली. आर्य समाजाची स्थापना मुंबईत झाली असली तरी महाराष्ट्रात आर्य समाजाची चळवळ फारशी वाढली नाही. मराठवाड्यात मात्र आर्य समाजाच्या अनेक शाखा प्रभावीपणे काम करत होत्या. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांच्या उदार आश्रयाने १९१८ साली कोल्हापूरात आर्य समाजाची स्थापना झाली. आर्य समाजाने कोल्हापूरात केलेल्या विविध प्रकारच्या कार्यांचा विस्तृत, सटीक आढावा घेणे गरजेचे आहे.

# <u>तळटीपा आणि संदर्भ</u>


१. केतकर श्री. व्यं. (सं. ); महाराष्ट्रीय ज्ञानकोश, खंड ८ वा, पृ. २८७, २८८.

२. नरेन व्ही. ए. ; सोशल हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, पृ. १७२.

३. आर्य पं. धर्मवीरजी; आर्य समाज एका दृष्टीक्षेपात, पृ. २.

४. भिडे ग. रं. ( सं. ); अभिनव मराठी ज्ञानकोश, भाग २, पृ. ५८.

५. नरेन व्ही. ए.; उपरोक्त, पृ. १७२.

६. छाब्रा जी. एस्, ; ॲन ॲडव्हान्स स्टडी इन द हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, खंड २, पृ. ३६९.

७. जोशी पं. महादेवशास्त्री ( सं. ); भारतीय संस्कृतिकोश, प्रथम खंड, पृ. ४८२, ४८३.

८. भिडे ग. रं. उपरोक्त, पृ. ५८

९. पाध्ये प्रभाकर व टिकेकर श्री. रा; आजकालचा महाराष्ट्र, पृ. २६६.

१०. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (सं. ) ; मराठी विश्वकोष, खंड २, पृ. २४६.

११. जोशी पं. महादेवशास्त्री ; उपरोक्त, पृ. ४८५.

१२. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री ; उपरोक्त, पृ. २४६.

१३. जोशी पं. महादेवशास्त्री ; उपरोक्त, पृ. ४८५.

१४. लोहार र.म. ; आधुनिक भारताचा इतिहास, पृ.५२; नरेन व्ही. ए; उपरोक्त; पृ. १७५.

१५. केतकर श्री. व्यं. ; उपरोक्त, पृ. २९५.

१६. कदम ना. ज्ञा.; मराठवाड्यातील आर्य समाजाची चळवळ, अप्रकाशित एम्. फिल्. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर, १९८८, पृ. २५ - २६.

१७. लोहार र. म. ; उपरोक्त, पृ. ५३.

१८. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री; उपरोक्त, पृ. २४६.

१९. पवार डॉ. जयसिंगराव ( सं. ) ; राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रस्तावना ' राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व कार्य ' पृ. १३५

२०. जोशी श्रीपाद (अनुवादक), सत्यार्थ प्रकाश, मूळ लेखक महर्षी दयानंद सरस्वती, ११ वी आवृत्ती, प्रस्तावना पृ. १७.

२१. पवार डॉ. जयसिंगराव ; उपरोक्त, पृ. १३५.

२२. जोशी श्रीपाद ; उपरोक्त, पृ. १७.

२३. कदम ना. ज्ञा; उपरोक्त, पृ. ३० - ३८.

२४. गर्गे स.मा; ' शाहू महाराज आणि आर्य समाज ', राजर्षी शाहू गौरव ग्रंथ (सं.) पी. बी. साळुंखे, पृ. ४२०.

२५. पवार डॉ. जयसिंगराव ; उपरोक्त, पृ. १३६.

२६. इदार - मुंबई इलाख्यात इदार हे एक संस्थान होते. त्याचे क्षेत्रफळ १६६९ चौ. मैल, लोकसंख्या १६८५२२ व वार्षिक उत्पन्न ४ लाख रु. होते. येथील महाराजांना १५ तोफांची सलामी दिली जात होती.

( संदर्भ - राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स, खंड ८, डॉ. विलास संगवे ( सं.), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००१).

२७. पवार डॉ. जयसिंगराव ; उपरोक्त, पृ. १३५.

२८. गर्गे स. मा. ; उपरोक्त, पृ. ४२४.

२९. पत्र नं. ७००४ -००६; शाहू महाराजांचे रॉबर्टसन यांना पत्र, १८ जानेवारी, १९१८, कोल्हापूर रेकॉर्ड ऑफीस , रुमाल नं. ३४, पुडका नं. १.

३०. पवार डॉ. जयसिंगराव ; उपरोक्त, पृ. १३७.

३१. गर्गे स.मा. ; उपरोक्त, पृ. ४२४, ४२५.

३२. कीर धनंजय ; राजर्षी शाहू छत्रपती, पृ. ३२०

३३. पत्र नं. ४९४८ - ५०; शाहू महाराजांचे कर्नल वुडहाऊस यांना पत्र, १९ फेब्रुवारी, १९१९, कोल्हापूर रेकॉर्ड ऑफीस, रुमाल नं. ३८, पुडका नं.२.

३४. कीर धनंजय ; उपरोक्त, पृ. ३२२.

३५. जोशी श्रीपाद ; उपरोक्त, पृ. १७.

३६. पवार डॉ. जयसिंगराव ; उपरोक्त, पृ. १३८.

३७. नाईक तु. बा.; छत्रपती राजर्षी शाहू महाराज, पृ. ५०.